महाराष्ट्र शासन

# उपनिबंधक सहकारी संस्था के/ पशिचम विभाग, मुंबई यांचे कार्यालय

गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९-अे, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

जा. क्र. मुंबई/उपनि/के-प विभाग/मंगल ऑचिड हौ /६६० /सन २०२६
दिनांक :- ९/०३ /२०२६.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब-२३(३) अन्वये आदेश.

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ब- २३(३) मधील तरतुद.

२) श्रीमती नासिम एस. कपाडिया यांचेकडील दि.३०.१२.२०२४, ०१/१०/२०२४, ३०/०९/२०२४, २९/११/२०२४, २२/११/२०२४, २५/११/२०२४ रोजीचा तक्रार अर्ज.

३) या कार्यालयाकडील दि.०३/०२/२०२५ रोजीची सुनावणी नोटीस.

ज्याअर्थी, **मंगल आर्चिड को-ऑप. हौ. सोसा. लि., ए विंग, बिल्डींग क्र.ए/२, ६ वा मजला, यारी रोड, अंधेरी (प.), मुंबई -४०० ०६१.** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ मधील तरतुदीनूसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून तीचा नोंदणी क्रमांक बीओएम/डब्लुकेडब्लु/एचएसजी/टीसी/११७८८/२००२-०३ दि.०९/१०/२००२ असा आहे. सदरची संस्था अंधेरी (पश्चिम) येथे कार्यरत असल्याने या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, **मंगल आर्चिड को-ऑप. हौ. सोसा. लि., विंग, बिल्डींग क्र.ए/२, ६ वा मजला, यारी रोड, अंधेरी (प.), मुंबई -४०० ०६१,** (यापुढे संस्था असे वाचावे) ही संस्था नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असल्याने संस्थेचा कारभार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६०, संस्थेचे मंजूर उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके, शासन निर्णय या मधील तरतुदीनूसार चालविला जाणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्था पदाधिकारी मागणी केलेली कागदपत्रे/माहिती उपलब्ध करुन देत नाही, त्यामुळे तक्रारदार यांनी या कार्यालयाकडे तक्रार दाखल केलेली होती, सदर तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाने दि.०३/०२/२०२५ रोजी सुनावणी नोटीस पारीत करुन या कार्यालयात दि.२५/०२/२०२५, १७/०३/२०२५, २१/०४/२०२५, १९/०५/२०२५, ३०/०६/२०२५, २४/०७/२०२५, १८/०८/२०२५, १६/०९/२०२५, ११/११/२०२५, १८/१२/२०२५, २७/०१/२०२६ रोजी सुनावणी घेण्यांत आली होती. सदर सुनावणीस

तक्रारदार श्रीम. नासिम कपाडीया, ॲड परवेझ कपाडीया उपस्थित होते. प्रतिवादी संस्थेतर्फे ॲड राजेश तिवारी हे उपस्थित होते. सदर प्रकरणी प्रथमत: अर्जदार यांचे म्हणणे, प्रतिवादी संस्थेचे म्हणणे नोंदवुन अनुमान निष्कर्षाद्वारे निर्णय देण्यात येत आहे.

ज्याअर्थी, अर्जदार श्रीम. नासिम कपाडिया यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत तक्रार करुन अवगत केले होते की, संस्था मागणी केलेली कागदपत्रे निरीक्षण व पडताळणी साठी उपलब्ध करुन देत नाहीत. संस्थेच्या सन २०२४ पासून झालेल्या सर्व सभांचे व्हिडीओ रेकॉर्डिंग, निवडणूकीबाबत सर्व कागदपत्रे, सन २०२४ रोजीपासून सर्व समिती सदस्यांची यादी, सर्व व्यवस्थापक समिती सभांची इतिवृत्त, संस्थेच्या थकबाकीदार सभासदांची यादी, स्टिल्ट पार्किंग वाटपाबाबत माहिती, संस्थेचे तात्पुरते, क्रियाशील व अक्रियाशील सभासदांची यादी, संस्थेच्या दि.०५/०१/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व व्हिडीओ रेकॉर्डिंग, संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत प्राप्त निविदाची माहिती, सीसीटीव्ही बसविण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदाची माहिती, पुर्नविकासाच्या अनुषंगाने नियुक्त कायदेशीर सल्लागार नियुक्तीच्या अनुषंगाने निविदाची माहिती , मे. नरेन कुवाडेकर प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांनी सादर केलेला फिजिबिलीटी रिपोर्ट, संस्थेच्या सर्व बँक खात्यांची सविस्तर माहिती,, दि.०१/०१/२०२५ ते दि.३०/११/२०२५ या कालावधीची बँक खात्याची माहिती, सन २०२४ च्या लेखापरिक्षण अहवालाची साक्षांकित प्रत व संस्थेवर दाखल झालेल्या कायदेशीर दाव्याची माहिती मागणी केलेली होती. परंतु संस्था पदाधिकारी यांना वारंवार मागणी करुन सुध्दा कलम १५४ ब-८ नुसार माहिती निरीक्षणसाठी व पडताळणीनंतर मागणी केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती दिलेल्या नाहीत. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ब-८ मध्ये "संस्थेच्या प्रत्येक सदस्यास, संस्थेच्या कार्यालयात, कामकाजाच्या वेळता किंवा त्या प्रयोजनासाठी ठरविलेल्या कोणत्याही वेळी अधिनियम, नियम व उपविधी यांची प्रत आणि शेवटचा लेखापरिक्षा झालेला वार्षिक ताळेबंद, नफा-तोटा याचा लेखा, समितीच्या सदस्यांची यादी, सदस्यांची नोंदवही, सर्वसाधारण बैठकीची कार्यवृत्ते आणि त्यांने संस्थेशी केलेले व्यवहार ज्यात नमूद केले आहेत, अशी पुस्तके व अभिलेख यांचे भाग विनामुल्य तपासण्याचा हक्क राहील. संस्था, लेखी विनंतीवरुन आणि निबंधक वेळोवेळी ठरवून देईल अशा दराने फी चे प्रदान केल्यावर, पूर्वगामी पोट-कलमामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही दस्तऐवजांच्या प्रती, अशा फी चे प्रदान केल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत कोणत्याही सदस्यला देईल आणि जेथे संस्थेला भाग भांडवलाच्या, कर्जाच्या किंवा जमिनीच्या स्वरुपात शासनाकडून सहाय्य देण्यात आले असेल त्याबाबतीत उक्त संस्था, सदस्याने अशी विनंती केल्याच्या तीस दिवसांच्या आत अशी माहिती देईल." अशी तरतूद आहे. परंतु संस्था कलम १५४ ब-८ चे उल्लंघन करीत आहे. संस्थेने या कार्यालयात तक्रारीच्या अनुषंगाने दाखल केलेल युक्तिवाद संयुक्तिक नाही. संस्था पदाधिकारी कायदा, नियम व उपविधीचे उल्लंघन करुन कामकाज करीत आहे. संस्थेचे पदाधिकारी यांनी मागणी केलेली कागदपत्रे ४५ दिवसापेक्षा अधिक कालावधी उलटून सुध्दा दिलेले नाहीत. उपविधी ७३ व १२३ नुसार संस्थेच्या अभिलेख सादर करण्याची जबाबदारी संस्थेच्या सचिवांची आहे. त्यामुळे संस्थेचे सचिव अपात्रतेस पात्र

ठरत आहेत. तसेच संस्थेचे खजिनदार यांनी २०२४ चा लेखापरिक्षण अहवाल अर्जदार यांना उपलब्ध करुन दिलेला नाही. तसेच त्यासंदर्भात कोणतेही उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अपात्र ठरत आहेत.

**Therefore in line with Paragraph No. ३० of Justice Amit Borkar's Judgement**

> **३०.** However, there may be rare cases where disqualification can be limited to certain members. This can happen only when the bye-laws clearly appoint a particular officer as the sole custodian of records and the Committee can show that the other members were not aware of the officer's lapse and that they took reasonable steps to ensure compliance. In such a situation, the lapse may be personal to that officer and not a collective failure. Only then can the Registrar restrict disqualification to that individual.

वरील निरीक्षणाच्या आधारे संपूर्ण व्यवस्थापक समितीस अपात्र ठरविणे आवश्यक नसून संस्थेच्या अभिलेखामध्ये असणाऱ्या त्रुटीसाठी प्रत्यक्ष जबाबदार असलेली व्यक्ती म्हणजे संस्थेचे सचिव तसेच त्यावेळेचे अध्यक्ष व खजिनदार हे जबाबदार असल्याचे आढळून येते. त्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर कलम १५४ ब २३(३) नुसार अपात्रतेबाबत कार्यवाही करण्यांची विनंती अर्जदार यांनी केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, प्रतिवादी संस्थेने या कार्यालयाकडे तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने युक्तिवाद दाखल केलेला असून त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, तक्रारदार यांनी केलेली तक्रार ही पूर्णपणे चुकीची व खोटया माहितीच्या आधारे केलेली आहे. तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीमध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य नाही. संस्थेच्या व्यवस्थापक समितीने कामकाज करताना कायदा, नियम व उपविधीचे उल्लंघन केलेले नाही. त्यामुळे सदरची तक्रार फेटाळण्यात यावी. तक्रारदार हे जाणीवपूर्वक खोटया तक्रारी दाखल करुन संस्थेच्या समितीस त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहेत. तक्रारदार श्रीम. नासिम कपाडीया हे संस्थेचे सभासद असून त्यांनी त्यांच्या सदनिका संदर्भात त्यांचा मुलगा श्री. झियान कपाडीया यांना सहयोगी सदस्य म्हणून नियुक्त केलेले आहे. संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाचे कामकाज सुरु असून तक्रारदार हे पुनर्विकासाच्या कामकाजात अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. तक्रारदार हे संस्थेच्या इतर सभासदांची व्यक्तिगत कागदपत्रांच्या माहितीची मागणी करीत आहे. परंतु इतर सभासदांची व्यक्तिगत कागदपत्रे देणे अपेक्षित नाही. संस्थेच्या लेखी म्हणण्यानुसार तक्रारदार यांना मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती याआधीच दिलेल्या आहेत. या व्यतिरिक्त त्यांना काही अतिरिक्त माहिती हवी असल्यास ते संस्थेस पूर्वसूचना देवून संस्थेच्या कामकाजाबाबतच्या कागदपत्रांची पडताळणी करुन विहित शुल्काचा भरणा करुन प्राप्त करुन घेऊ शकतात. तक्रारदार यांना संस्थेने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने पडताळणी दिलेली असून त्यांना सभांचे व्हिडीओ रेकॉर्डिंग प्राप्त करुन घेण्यासंदर्भात पेनड्राईव्ह आणण्यास सूचित केलेले होते. परंतु त्यांनी अद्याप पेनड्राईव्ह संस्थेकडे दिलेला नाही. दि.१२/१०/२०२५

रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत श्री. झियान कपाडीया यांनी संस्थेचे वास्तुविशारद मे. रतन सी त्यांना बदनामीकारक व अपमानकारक भाषा वापरलेली आहे. त्यामुळे श्री. झियान कपाडीया यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई सुरु करण्यासाठी सदर सभेचे इतिवृत्त व व्हिडीओ रेकॉर्डिंग ची प्रत मिळण्याची विनंती त्यांनी केलेली आहे. तक्रारदार संस्थेच्या पदाधिकाऱ्याविरुध्द पोलिस स्थानकात खोटया तक्रारी दाखल केलेल्या आहेत. तक्रारदार यांना मागणी केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने पडताळणी तसेच कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहेत. त्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर कलम १५४ ब २३(३) अंतर्गत कारवाई करणे अपेक्षित नाही. संस्थेचे कामकाज कायदा, नियम व उपविधीनुसार होत असून संस्थेच्या सभासदांना संस्थेचे पदाधिकारी यांचे कामकाजावर विश्वास असून ९८ सभासदांनी संस्थेच्या समितीच्या बाजूने विश्वासदर्शक पत्र दिलेले आहे. तक्रारदार हे त्यांच्या व्यक्तिगत स्वार्थासाठी संस्थेविरुध्द खोटया तक्रारी करीत आहे. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता तक्रारदार यांनी केलेली तक्रार ही पूर्णपणे चुकीची असून तथ्यहीन आहे. तक्रारदार संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकासाच्या कामकाजामध्ये जाणीवपूर्वक अडथळे आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे सदरची तक्रार फेटाळून निकाली काढण्यांत यावी अशी विनंती संस्थेने या कार्यालयास केलेली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ब-८ (१) मधील तरतुदीनुसार संस्थेच्या प्रत्येक सदस्यास, संस्थेच्या कार्यालयात, कामकाजाच्या वेळात किंवा त्या प्रयोजनासाठी ठरविलेल्या कोणत्याही वेळी अधिनियम, नियम व उपविधी यांची प्रत आणि शेवटचा लेखापरिक्षा झालेला वार्षिक ताळेबंद, नफा-तोटा याचा लेखा, समितीच्या सदस्यांची यादी, सदस्यांची नोंदवही, सर्वसाधारण बैठकीची कार्यवृत्ते, समितीच्या बैठकीची कार्यवृत्ते आणि त्याने संस्थेशी केलेले व्यवहार ज्यात नमूद केले आहेत, अशी पुस्तके व अभिलेख यांचे भाग विनामूल्य तपासण्याचा हक्क आहे. सदर दस्तऐवज तपासणीसाठी तर तात्काळ उपलब्ध करुन दिली पाहिजेत. परंतु संस्थेचे चेअरमन, सेक्रेटरी, खजिनदार व इतर समिती सदस्यांनी जाणुनबुजुन सभासदांची लेखी मागणी असूनही कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत. नमुद दस्तऐवजांच्या प्रती कलम १५४ब-८ (२) नुसार ४५ दिवसांत अर्जदारास उपलब्ध करुन देणे आवश्यक असताना ते मुदतीत उपलब्ध करुन दिले नाहीत. या कार्यालयाने कलम १५४ब-८ अन्वये दि.०३/०२/२०२५ रोजी नोटीसी देवून सुध्दा मागणी केलेली कागदपत्रे देण्यास विलंबच केलेला आहे त्यामुळे त्यांचेवर कारवाई करणे आवश्यक आहे. त्यामुळे संस्थेचे पदाधिकारी समिती कायदा, नियम व संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतुदीचे उल्लंघन करुन कामकाज करीत असल्याचे दिसून येते. आणि,

ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय मुंबई येथील रिट पिटीशन क्र. ५०९६/२०२२, शाहिद तांबोळी व इतर विरुध्द विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व इतर प्रकरणी आदेश पारित केले असून त्यामध्ये खालीलप्रमाणे निष्कर्ष नोदविले आहेत. The prescription of time limit under sub-section (2) of Section 154B-8 is required to be considered through the prism of the basic nature of the documents. Ordinarily, the society would not be required to invest time and

energy in retrieving the aforesaid documents as they are expected to be maintained at all the times by the Society. Once the aforesaid nature of the obligation cast on the society is appreciated, the object of the prescription of time limit under sub-Section (2), with the pain of disqualification under Section 154B-23 (1) (iii) becomes discernible. While conferring a right upon a member of the society to get the copies of the aforesaid record of the society, a duty is cast on the latter to furnish the same to promote transparency and efficient management of the affairs of the society. To ensure that a member is not deprived of the access to the basic record and also avert the management of the affairs of the society in breach of the provisions of the Act, 1960 and the Rules, 1961 and the bye-laws, the duty is sought to be enforced by prescribing a penalty of disqualification of the members of the committee, in the event of default in furnishing the copies of those documents. Section 154B-23 (1) (iii) visits the consequences of disqualification qua the member of the committee who has been held responsible under the specified Section 154B-8 (2). The legislature considered it appropriate to remedy the malady by providing for disqualification in case of specified defaults where no other provision in relation to disqualification to be a member of the committee is made under the Act and the Rules. त्यानुसार कलम १५४ब-८ नुसार विहित कालावधीत सभासदास माहिती, कागदपत्रे न दिल्यास जबाबदार पदाधिकारी/समिती सदस्य यांना कलम १५४ब-२३ नुसार अपात्रता येते.

ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय मुंबई येथील रिट पिटीशन क्र. १४०८७/२०२३, श्रीम. नायर सुरेशकुमार व इतर विरुध्द द स्टेट ऑफ महाराष्ट्र व इतर प्रकरणी आदेश पारित केले असून त्यामध्ये खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहेत. Section 154B-8 gives a clear right to every member to see the records of the Society and to receive copies of those records within the time fixed by law. This right carries with it a duty on the Society and its Managing Committee to respond without delay. The law expects the Society to function in the open. Members must know how decisions are taken and what business is conducted in their name. If information is kept back, members cannot protect their interests. The Legislature has therefore placed a strict duty on the Society to give documents when asked. This provision aims to prevent any hidden or secret working of the committee. The Managing Committee holds office for the benefit of all members. It cannot keep records away from them. When a member asks for copies of minutes or other documents, the Society must supply them promptly. Silence, delay or inaction cannot

be treated as a valid answer. If the Society does not act, the right given by the law becomes meaningless. A committee that avoids giving records raises doubt about its functioning. The law does not permit such conduct. The duty to supply documents is therefore not optional. It is a binding obligation that must be honored in both letter and spirit.

Section 154B-23 has been enacted to make sure that those who run the Society do so in a responsible and honest manner. Members of a Managing Committee hold a position of trust. They deal with the money, property and day-to-day affairs of the Society. When a committee member refuses to give documents, hides information or blocks a members lawful right under Section 154B-8, such conduct shows that he cannot be trusted to continue in that position. The law therefore treats such a person as unfit to remain on the Committee. This provision is meant to protect the cooperative movement. A Society can function smoothly only when its committee works openly and truthfully. The Legislature has therefore empowered the Registrar to step in at the earliest sign of such misconduct. The Registrar is given authority to disqualify such committee members so that misuse of power does not continue, and the Society does not suffer further harm. A person who does not respect the rights of the members cannot be allowed to hold a position where those rights must be safeguarded. The law steps in to remove such persons so that cooperative institutions remain clean and well-governed.

In some situations, disqualification of the entire Committee becomes necessary. This happens when the non-compliance is not caused by one person alone but by the collective inaction of the whole Committee. If no member of the Committee takes steps to comply, if repeated reminders are ignored, if the Committee shows a pattern of delay or withholding information, or if the documents relate to the Committee's own meetings and decisions, the Registrar is justified in treating the whole Committee as responsible. In such cases, disqualifying the entire Committee is lawful and appropriate.

The question the Registrar must not ask is who was supposed to give the documents. The correct question is who failed in their legal duty to make sure that the documents were given. A Committee cannot escape responsibility by blaming one

officer when, in reality, the whole Committee ignored requests, failed to act on the Registrars direction and allowed the breach to continue for months. त्यामुळे सभासदास कलम १५४ब-८ मधील तरतुदीनुसार विहित कालावधीत कागदपत्रे देण्यास कसूर करणाऱ्या पदाधिकारी व समिती सदस्य यांचेवर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ब-२३ (१) (तीन) यामध्ये या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या अन्य तरतूदींना बाधा न पोचवता, समितीच्या सदस्य म्हणून असण्यासाठीच्या अनर्हतेच्या संबंधात जर कोणतीही व्यक्ती, तीला कलम ७९,८८, १५४ ब ८(२) किंवा १५४ ब २७ अन्वये, जबाबदार धरण्यात आले असेल किंवा कलम ८५ अन्वये चौकशीचा खर्च देण्यासाठी जबाबदार धरण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती पाच वर्षांसाठी समितीचा सदस्य म्हणून नियुक्त केली जाण्यास, नामनिर्देशित केली जाण्यास, निवडून दिली जाण्यास, स्वीकृत केली जाण्यास पात्र असणार नाही अशी तरतूद आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता संस्थेचे सचिव व खजिनदार हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ब-८ मधील तरतुदींचे उल्लंघन वारंवार करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. अब्दुल लतिफ मारक्कर हे कलम १५४ब-२३(१) (पाच) नुसार अनर्ह ठरत असल्याने त्यांचे समिती सदस्य तसेच संस्थेचे अध्यक्ष यांना दि.११/०२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये आधीच अपात्र केलेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणात त्यांचे नाव वगळणे आवश्यक आहे. संस्थेचे सचिव व खजिनदार यांनी मागणी केलेली कागदपत्रे विहित मुदतीत देण्याकरीता जाणूनबुजून व हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केलेली असल्याचे निश्चित झाले आहे. संस्थेच्या व्यवस्थापक समितीला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ब-२७ नुसार जबाबदार धरण्यात आल्याने कलम १५४ ब-२३(१) खंड (तीन) नुसार संस्थेचे सचिव व खजिनदार हे समिती सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरत आहेत. त्यामुळे त्यांना कलम १५४ब-८ व १५४ ब-२३ (३) नुसार त्यांना पाच वर्षासाठी समिती सदस्य म्हणून पुनर्नियुक्त, पुनर्स्विकृत किंवा पुनर्नामनिर्देशित करण्यात अपात्र करणे आवश्यक असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब-२३(३) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, डॉ. सुनिल कोठावळे, उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई याद्वारे **मंगल आर्चिड को-ऑप. हौ. सोसा. लि., ए विंग, बिल्डींग क्र.ए/२, ६ वा मजला, यारी रोड, अंधेरी (प.), मुंबई -४०० ०६१** या संस्थेच्या संदर्भात आदेश देत आहे की, नमूद संस्थेचे श्री. मोहम्मद उस्मान खान - सचिव व श्री. सलिम इब्राहीम कसमानी - खजिनदार यांना कलम १५४ब-८ मधील तरतुदींचे पालन करणेबाबत कसुर केल्याने जबाबदार धरुन त्यांना समितीचा सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह घोषित करीत आहे. तसेच त्यांनी समिती सदस्य म्हणून राहण्यास अनर्हता ओढवून घेतल्याने ते

समितीचा सदस्य असण्याचे बंद झाले असून, त्यांची जागा रिक्त झाल्याचे घोषित करीत आहे. वरील सचिव व खजिनदार यांना या आदेशाच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षासाठी समितीचा सदस्य म्हणून पुनर्नियुक्त, पुनर्स्विकृत किंवा पुनर्नामनिर्देशित केला जाण्यास अपात्र करण्यांत येत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १८/०३/२०२६ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

उपनिबंधक सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, OFFICE OF THE DEPUTY REGISTRAR C.S. K/W WARD, MUMBAI मुंबई

(डॉ.सुनिल कोठावळे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था,के/पश्चिम,विभाग,मुंबई

**प्रत :-**
**१. श्री. मोहम्मद उस्मान खान - सचिव, शॉप क्र.८ बी/ए विंग**
**२. श्री. सलिम इब्राहीम कसमानी - खजिनदार, सदनिका क्र. ए-१/६०१**
मंगल आर्चिड को-ऑप. हौ. सोसा. लि., ए विंग,
बिल्डींग क्र.ए/२, ६ वा मजला, यारी रोड,
अंधेरी (प.), मुंबई -४०० ०६१
**३. चेअरमन व इतर समिती सदस्य,**
मंगल आर्चिड को-ऑप. हौ. सोसा. लि., ए विंग,
बिल्डींग क्र.ए/२, ६ वा मजला, यारी रोड,
अंधेरी (प.), मुंबई -४०० ०६१
**४. श्रीम. नासिम एस. कपाडिया, सदनिका क्र. ६०१,**
मंगल आर्चिड को-ऑप.हौ.सो.लि., ए विंग,
बिल्डींग क्र.ए/२, ६ वा मजला, यारी रोड,
अंधेरी (प.), मुंबई -४०० ०६१

उपनिबंधक,
सहकारी संस्था,के/पश्चिम,विभाग,मुंबई